**प्रेसनोट दिनांक- २५/०६/२०१९**

**भारती विदयापीठ पोलीस ठाणे**

**कात्रज वडगाव बायपास वरील बेलदरे पेट्रोल पंपावर दरोडा टाकण्याचे तयारीत असलेली टोळी अटकेत**

दिनांक २२/६/२०१९ रोजी रात्रौ भारती विदयापीठ पोलीस ठाणेचे तपास पथकाचे अधिकारी महेंद्र पाटील व त्यांची टिम पोलीस ठाणे हददीत पेट्रोंलीग करीत असणारे तपास पथकाचे कर्मचारी **सहा.पो.फौजदार प्रदीप गुरव, व पो.हवा.विनोद भंडलकर** यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, पाच ते सहा इसम कात्रज वडगाव बायपासवरील रंगोली मार्बल दत्तनगर कडे जाणारे कच्या रोडवर अंधारामध्ये थांबलेले असून ते बेलदरे पेट्रोल पंपावर दरोडा टाकण्याचे तयारी मध्ये आहेत अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याचे पोलीस उप-निरीक्षक महेंद्र पाटील यांना कळविली असता त्यांनी ताबडतोब सदरची माहीती श्री विष्णु पवार सो वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो व विष्णु ताम्हाणे पोलीस निरीक्षक (गुन्हे) भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांना कळविली असता त्यांनी तपास पथकातील कर्मचारी यांचेसह ताबडतोब कारवाई करणेबाबत आदेश दिल्याने सदर आदेशाप्रमाणे तपास पथकाचे अधिकारी पोलीस उप-निरीक्षक श्री महेंद्र पाटील यांनी तपास पथकाचे कर्मचा-यांचे दोन ग्रुप तयार करुन कात्रज वडगाव बायपासवरील रंगोली मार्बल दत्तनगर कडे जाणारे कच्या रोडवर सापळा लावुन दिनांक २३/६/२०१९ रोजी रात्रौ ०१.२० वा इसम नामे १) निलेश राजु कुडले वय-२० वर्ष रा.पापळवस्ती श्रीरामनगर बिबवेवाडी पुणे २). तेजस संदीप वाडकर वय-२० वर्ष रा. पापळवस्ती बिबवेवाडी पुणे ३) सनी संजय साळवी वय-२० वर्ष रा.स.नं-६३४ /७ अ गणपतनगर पापळवस्ती बिबवेवाडी पुणे ४) सनी दत्तात्रय बोरकर वय-१९ वर्ष रा.अप्पर व्ही.आय.टी शाळेजवळ बिबवेवाडी पुणे यांना ताब्यात घेतलेले असुन त्यांचे ताब्यात दोन लोखंडी कोयते, एम मिरची पुड व दोन मोटार सायकली, मोबाईल हॅन्डसेट असा कि.रु १,१८,९५०/-रु चा माल मिळुन आलेला असुन त्यांना अटक केलेली आहे. त्यांचा साथीदार अक्षय हा अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेलेला आहे. पुढील तपास पोलीस उप-निरीक्षक महेंद्र पाटील भारती विदयापीठ पोलीस ठाणे हे करीत आहेत.

यातील अटक आरोपी क्रमांक १ ते ३ हे बिबवेवाडी पोलीस ठाणे हददीतील रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन १ व २ यांचेवर दरोडयाचा तसेच अनु ३ याचेवर गंभीर दुखापत केलेचा गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई मा.श्री श्रीकांत तरवडे सो अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग, मा.श्री बच्चन सिंह सो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे शहर, मा.प्रीती टिपरे मॅडम सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, विष्णू पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विष्णू ताम्हाणे पोलीस निरीक्षक (गुन्हे), भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.महेंद्र पाटील , सहा.पो.फौजदार प्रदीप गुरव, पोलीस हवालदार विनोद भंडलकर, गणेश सुतार, प्रणव सकपाळ, उज्वल मोकाशी, शिवदत्त गायकवाड, जगदीश खेडकर यांचे पथकाने केलेली आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**

**भारती विदयापीठ पोलीस ठाणे पुणे**